वि.दि.दा.क्रं. १४ / २०१९
महेबुब / शिवाजी
नि.क्रं. ७०

**<u>सरतपास प्रतिवादी तर्फे श्री.डी.एल.घोगरे , वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

**१२.** आता मला नि.क्रं.४/४ हा कागद दाखवला. ती नोटीसची स्थळप्रत असून त्यावर माझी व वकीलांची सही आहे. त्यातला मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ७२** देण्यात यावी.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास वादी तर्फे श्री.बी.के.मुरकुटे, वकील यांच्यामार्फत सुरु.**

**१३.** मी दहावीपर्यंत शिकलो आहे. हे खरे की, मला मराठी भाषा समजते आणि लिहीता वाचता येते. हे खरे की, मी कोणत्याही कागदपत्रांवर वाचल्याशिवाय सही करत नाही. दि. ०२/३/२०१५ रोजी मी आणि वादी क्रं १ यांच्यामध्ये जो करार झाला त्यावर मी वाचून सही केली होती. हे खरे की, दि. १०/०४/२०१५ रोजी वादी क्रं. १ याने मला रु.२,६०,०००/ दिले होते व त्याची रशीद पावती मी वादी क्रं. १ ला दिली होती. हे खरे की,दि.११/०६/२०१५ रोजी वादी क्रं.१ ने मला रु.२,५०,०००/ दिले असल्याबद्दल मी त्याला पावती दिली आहे.

**१४.** हे खरे नाही की, दि. ०१/०४/२०१६ रोजी मी व वादी क्रं.१ ते ३ यांच्यामध्ये झालेल्या करारावर मी तो करार वाचून सही केली. आता मला दाखवलेला करार नि.क्रं. ५९ वर प्रत्येक पानावर माझी सही आहे. मी पूर्ण करार वाचलेला नाही. हे खरे की, दि.०१/०४/२०१६ रोजीच्या करारामध्ये पूर्वीच्या दि.०२/३/२०१५ रोजीच्या कराराचा उल्लेख आहे. दि. ०१/०४/२०१६ रोजीचा करार मला मान्य असल्याने मी त्यावर सही केली हे खरे नाही. दि. ०९/०८/२०१६ मला वादी क्रं १ रु. २,००,०००/ दिले हे खरे नाही. आता मला निशाणी ५२ ही पावती दाखवली त्यावरील सही माझी आहे ती खरी नाही. साक्षीदारांसमोर सही केली हे खरे नाही. मी हस्ताक्षर तज्ञांकडे तपासण्यासाठी माझी सही पाठवायला तयार आहे. पैसे मिळाले म्हणून मी सही केली हे खरे नाही. परळी व दावतपूर या गावी कोणत्या

व्यक्तीची जमीन व प्लॉट खरेदी करणार होतो हे मला आठवत नाही. त्या जमीनीचा सर्वे नं., प्लॉट नं. मला आठवत नाही. त्या कराराची तारीख मला आठवत नाही. दि. ०१/०४/२०१६ रोजी वादी क्रं. १ ते ३ यांच्याशी केलेल्या करारामध्ये मी कराराचा अवधी वाढवून घेतला हे म्हणणे खरे नाही. आता मला नि ७२ ची नोटीस दाखवली ती नोटीस मी वादीना दिलेली आहे. त्या नोटीसमधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. हे खरे की दावाजमीनीचा मी दि.२१/०१/२०१४ रोजी शेख सिराज जाफरी आणि शेख मोईज जाफरी याच्याशी ठराव केला. हे खरे नाही की, हा ठराव रद्द व्हावा म्हणून वादी क्रं. १ कडून मी रु.२,००,०००/ घेतले होते. दि. २७/०४/२०१९ रोजी वादींनी वकील श्री.ए.एम.शेख यांच्याकडून मला एक करार पूर्ण करुन दयावा म्हणून नोटीस दिली होती. कराराची अंमलबजावणी दि.१०/०५/२०१५ पर्यंत करुन घ्यायची होती असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. हे खरे नाही वादींना करार पूर्ण करायला टाळाटाळ केली असे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, वादीमुळे मला शारीरिक ,मानसिक व आर्थिक त्रास झाला असे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, माझ्यामुळेच वादीला आर्थिक नुकसान झाले. कराराची पूर्तता करण्यास मी बांधील आहे हे म्हणणे खरे नाही. दावाजमीन विकून मला दुसरी घ्यायची आहे असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. दावाजमीन विकून मी दुसरी जमीन घेऊ शकलो नाही त्यामुळे माझे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाले असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. वादीने मला धमकी दिल्याचे मी खोटे सांगतो हे खरे नाही. त्याबद्दल मी पोलिसांत तक्रार केलेली नाही. परळीमध्ये जी जमीन मी विकत घेणार होतो त्या मालकाला मी किती रक्कम दिली हे मला आठवत नाही. हे खरे नाही की, कराराप्रमाणे पूर्तता करणे किंवा करारातील रक्कम परत करणे यास मी बांधील आहे हे खरे नाही. हे खरे नाही की, दावामिळकतीची किंमत एक कोटी असल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, वादी आजही ४,०१,०५१/ रु. देऊन खरेदीपत्र करुन घ्यायला तयार आहेत. मी सांगतो माझी नुकसानीची रक्कम खूप जास्त आहे. हे खरे नाही की, करारपत्रातील जमीनीचे खरदेपत्र करुन न देता रक्कम हडप करता यावी

म्हणून मी खोटी साक्ष देतो. हे खरे नाही की, वादीला मला जमीनही विकायची नाही आणि त्याचे पैसेही परत दयायचे नाहीत म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे हे खरे नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक ०९/०४/२०२५.** दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.